## समुपदेशन प्रक्रियेपूर्वी उमेदवारांना द्यावयाच्या सुचना

- उमेदवारांनी समुपदेशनासाठी येताना त्यांचे मूळ ओळखपत्र सोबत आणावे. (उदा. आधार कार्ड / पॅन कार्ड / मतदान कार्ड / ड्रायव्हिंग लायसंन्स इ.) ओळख पत्रा शिवाय उमेदवारांना आदेश निर्गमित केले जाणार नाहीत.
- उमेदवारांना अंतिम निवड यादीतील गुणवत्तेनूसार समुपदेशनास बोलविण्यात येईल.
- प्रशिक्षण केंद्रनिहाय जागांचे display सभागृहात केला जाईल.
- उमेदवाराने प्रशिक्षण केंद्राची निवड केल्यानंतर त्यामध्ये कुठलाही बदल केला जाणार नाही.
- जिल्हानिहाय निवड करावयाच्या उमेदवारांची संख्या आरोग्यवर्धिनी केंद्रांच्या मंजूर संख्येनुसार निश्चित केलेली असल्याने अतिरिक्त उमेदवारांना इतर जिल्हयामध्ये नेमणूक करण्यासाठी संधी देण्यात येईल. समुपदेशनाने शेवटी याबाबत माहिती देण्यात येईल.
- उमेदवारांनी समुपदेशनासाठी त्यांची सर्व मूळ कागदपत्रे सोबत आणावीत तसेच मुळ प्रमाणपत्रांच्या दोन साक्षांकित प्रती सोबत आणाव्यात.
- समुपदेशन प्रक्रियेदरम्यान कोणाही उमेदवाराने समिती सदस्यांवर राजकिय दबाव आणू नये. तसे केल्यास त्यांना समुपदेशन प्रक्रियेमधून अपात्र करण्यात येईल.
- उमेदवाराने प्रवेश परिक्षेसाठी देण्यात आलेले Admit Card ची प्रत सोबत आणावी.
- प्रशिक्षण केंद्र जागा वाटप आदेश प्राप्त झाल्यानंतर उमेदवाराने दि. १९ फेब्रुवारी २०२१ पर्यंत प्रशिक्षण केंद्राच्या ठिकाणी रूजू व्हावे.
- प्रशिक्षणा दरम्यान उमेदवारांनी ८०%हजेरी पूर्ण करणे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे नियमाप्रमाणे आवश्यक राहील. हजेरी पूर्ण न भरल्यास उमेदवार EXIT EXAM साठी अपात्र ठरविण्यात येईल. यासाठी फक्त बायमॅट्रीक हजेरीचा विचार केला जाईल.
- प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षण केंद्रामध्ये शिस्तभंग केल्यास उमेदवारावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.
- प्रशिक्षण केंद्रांमध्ये बायोमेट्रीक हजेरी पटाचा वापर विद्यावेतन देण्यासाठी केला जाईल.
- उमेदवारांना दरमहा रू. १०,०००/- प्रमाणे विद्यावेतन अनुज्ञेय राहील.
- उमेदवारांनी प्रशिक्षणा दरम्यान त्यांच्या निवासाची व्यवस्था स्वत: करावी.
- प्रशिक्षणासाठी लागणारे Modules, Journals, log book इ.प्रशिक्षण केंद्रांमार्फत पुरविण्यात येतील.
- आयुर्वेदिक युनानी व बी.एस्सी. (नर्सिंग) उमेदवारांसाठी प्रशिक्षण सहा महिन्यांचे राहील.
- प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर उमेदवारांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक यांचेमार्फत आयोजित केल्या जाणारी EXIT EXAM उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. सदर EXIT EXAM उत्तीर्ण होणेसाठी उमेदवारांना एकूण २ attempt लागू राहतील.
- EXIT EXAM उत्तीर्ण झाल्यानंतर उमेदवारांना त्यांनी ज्या जिल्हयांसाठी प्रवेश परिक्षा दिली आहे, त्या जिल्हयामधील उपकेंद्र स्तरावरील आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये EXIT EXAM च्या गुणवत्तेच्या आधारे जिल्हास्तरीय समुपदेशनाने नियुक्ती आदेश दिले जातील.
- निवड झालेल्या उमेदवारांने दिलेल्या जिल्हयात तीन वर्षे सेवा देणे बंधनकारक आहे.
- निवड झालेल्या सर्व उमेदवारांकडून जिल्हा आरोग्य अधिकारी करारनामा भरून घेतील. सदर करारनाम्यामध्ये रू. १,०३०००/- (एक लक्ष तीन हजार रुपये) प्रमाणे उमेदवाराकडून प्रशिक्षण अर्धवट सोडून गेल्यास तसेच प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर दिलेल्या जिल्हयामध्ये ३ वर्ष सेवा न केल्यास वसूलीबाबत हमीपत्र भरून घेण्यात येईल.
- राज्यात सदयस्थित कोवीड-१९ साथरोगाची परिस्थिती असल्याने शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.